International Indexed, Refereed Research Journal, ISSN 2250-253x,(Print), E-ISSN 2320-544x, Issue4, Vol- I, April, 2013

शोध पत्र- मराठी

# महात्मा फुले – कृषी विषयक विचार

* प्रा. डॉ. सुनील आंनदराव राठोड़

* श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर , जि . अमरावती

**प्रस्तावना-**

म. ज्योतीराव फुले यांच्या मृत्युला १०० वर्षे पूर्ण होऊन गेली त्यांनी तत्कालीन जे विचार मांडले ते आजच्या काळालाही महत्वाचे वाटतात म्हणून थोर सुधारक म्हणून महात्मा ज्योतीराव फुले यांची ओळख आहे. ज्यांनी आपल्या आचरणाने, विचाराने आणि कृतीने शक्ती प्रदान केली त्यामध्ये म. फुले यांचे नाव अग्रस्थानी आहे. म्हणून आ. ह. साळुंखे म्हणतात,“ भारताच्या सांस्कृतिक इतिहासात, बहुजनाच्या बाजूने जे उतुंग अविष्कार झाले. त्यामध्ये महात्मा फुले यांचे समग्र व्यक्तिमत्त्व अग्रभागी आहे.” [१] म. फुले हे महाराष्ट्राचे समाजचिंतक होते. त्यांनी महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी, दलित, बहुजनसमाज तसेच स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात आवाज उठविला. आपली समाजव्यवस्था ही अस्पृशांना व शेतकऱ्यांना कधीही न्याय देऊ शकणार नाही हे त्यांना माहिती होते. म्हणूनच त्यांनी अस्पृश व शेतकरी यांच्या उद्धारासाठी लेखनीचे आसूड हाती घेतले आणि जाती व पंथाच्या लोकामध्ये बंधूता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन परिस्थिती अनुकूल नव्हती. त्यांना कडवा विरोध झाला.

सर्व समस्याचे मुळे कारण शिक्षण आहे याची त्यांना जाणीव होती म्हणून ते म्हणतात, “विद्येविना मती गेली मतीविना निती गेली, निती विना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.” [२] याचाच अर्थ असा की, शुद्र शेतकरी आणि बहुजन समाज इतक्या दैन्य अवस्थेत का आला याचे कराण म्हणजे अशिक्षितपणा आणि धर्म असे म. फुले यांनी निर्भिडपणे स्पष्ट केले. “त्यांनी हिंदू समाजातील शूद्रातिशूद्रांच्या व्यथा निःशंकपणे बोलून दाखविल्या आणि कर्जबाजारीपणापायी हैराण झालेल्या शेतकऱ्यांची गऱ्हाणी वेशीवर टांगली. खेड्यापाड्यातील या शेतकऱ्यांचे अज्ञान व दारिद्रय हे ईश्वरनिर्मित नसून त्यांचे मूळ आपल्या समाजव्यवस्थेत आहे हे त्यांना बरोबर उमगले होते.” [३] त्यांनी आपल्या शेतकऱ्यांच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केले. खेड्यातील शेतकऱ्यांशी त्याचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. या शोषीत लोकांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणण्याचा त्यांनी दृढ निश्चय केला.

शिक्षण हे सर्व समस्यांचे मुळ आहे. त्यामुळे त्यांनी शिक्षणाचा पुरस्कार केला. शोषीतांच्या मूलांना शिक्षण द्यावे त्यासाठी सरकारने प्रयत्न करावे, अद्यौगिक शिक्षण द्यावे व वसतीगृहे कढावीत अशा उपाययोजना सूचवल्या त्या काळात शेतकऱ्याच्या अज्ञानाचा फायदा घेणारा व त्याचे शोषण करणारा दुसरा वर्ग म्हणजे इंग्रज अधिकारी वर्ग होता त्यांचा स्वार्थ अशिक्षीत शेतकऱ्याच्या लक्षात येत नव्हता. शासन दरबारी सगळीकडे बेजबाबदारपणा, वशिलेबाजी, पक्षपात, लाचलुचपत इ. गोष्टी बोकाळल्या होत्या अशा वेळी दैनिय शेतकरी कसा सुखी राहणार “ त्यांच्या गफिलपणामुळे एकंदर सर्व खात्यात ब्राम्हण कामगारांचे प्राबल्य असते या दोन्ही कारणांमुळे शेतकरी लोक इतके लुटले जातात की, त्यास पोटभर भाकर व अंगभर वस्त्र ही मिळत नाही.” [४] शेतकरी असा शोषीत लोकांच्या जाळ्यात अडकला होता. सर्व बाजूंनी शेतकऱ्याचा कोंडमारा होत होता. “जो शेतकरी कष्टकरी वर्ग हा देशातील सुखाचा पाया असतो ज्याच्याच श्रमावर शेतकरी फौजफाटा,दारुगोळा, गोऱ्या कर्मचाऱ्यांचा ऐशआराम व काळ्या कामगाराचे लठ्ठ पगार अवलंबून असतात त्याचे हाल कुत्रे खात नाही.” [५] मराठ्यांच्या शासन काळातही शेतकरी आपल्या उत्पन्नाच्या एक तृतीयांश भाग जहागीरदार, इनामदार यांच्याकडे महसूल म्हणून जमा करीत होता. इंग्रजींनी धारापध्दती अमलात आणली आणि शेतीवर कर लादला. हा कर जमा केला नाही तर शेतीचा लिलाव करुन कर वसूल केला जात होता. यातूनही शेतकऱ्याची अधोगती होऊ लागली.

या सरकारी शोषणाऱ्या व्यतिरिक्त धार्मिक विधी व कर्मकांडाच्या नावावर केले जाणारे शोषण आणखी वेगळेच होते. शेतकऱ्यांना धर्माच्या नावाखाली व अंधश्रध्देपोटी कसे लुटले जाई याचे बारीकसारीक चिंतन म. फुले यांनी केले आहे. शेतकरी जन्माला आल्यापासून मरेपर्यंत धर्माच्या नावाखाली लुबाडला जातो आणि त्याच्या मृत्युनंतर देखील त्याच्या मुलास श्राध्दविधीने नाडले जात होते. अज्ञान हेच शेतकऱ्याच्या दुःखाचे मुळे कारण आहे. म्हणून त्यांनी शेतकऱ्याच्या शिक्षणाच्या विरोधात आड येणाऱ्यांना फटकारले आणि सरकारवर देखील आले आसूड उगारले. या शेतकऱ्याचे अज्ञान दूर करण्यासाठी शाळा सुरु करण्याचा प्रयत्न केला.

तसेच म. फुले यांची दुरदृष्टी ही वाखाणण्यासारखी होती शंभर वर्षापूर्वी वृक्षाची काही कमतरता नव्हती तरीही तेव्हा त्यांनी म्हटले सरपणाला लाकूड म्हणुन पालापाचोळ्याचा वापर करावा, वृक्षतोड करु नये व वृक्षतोडू नये असा कायदा करावा. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात विहिरी खोदाव्यात शेतीचा विकास घडवून आणावा. शेतात शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त उत्पन्न काढावे म्हणून त्यांना उत्तेजनाकरीता बक्षिस द्यावीत असे विचार त्याकाळात त्यांनी व्यक्त केले. शेती सुधारण्यासाठी तंत्रज्ञानावर भर दिला. “नवी बी-बियाणे तसेच यंत्र याचा उपयोग करणे, नवीन तंत्रज्ञानाच्या साह्याने कृषी उत्पन्न वाढवणे, शेतकऱ्यांच्या मुलांना कृषी संबंधी नवीन ज्ञान देणे,

त्यांना परदेशी पाठवून त्यांना विकसीत कृषी दाखवणे, कृषी प्रदर्शनाचे आयोजन करणे, त्यामध्ये यश मिळवणाऱ्याला पुरस्कार देणे" [६] शेतकऱ्यांनी पारंपरीक शेती न करत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करुन शेती करावी असा वैज्ञानिक दृष्टीकोण आज सुध्दा महत्वपूर्ण वाटतो. इतकेच नाही तर त्यांनी शेतकऱ्यांना देखील त्याच्या स्थितीत सुधार व्हावा यासाठी मोलाचे विचार सांगीतले "शेतकऱ्यांनी बालविवाह, बहुविवाह, मद्यपान, मौजमजा करण्यामध्ये होणारा खर्च, छोट्या करणाबद्दल होणारी भांडणे, त्यामुळे त्याचे होणारे नुकसान इत्यादी गोष्टी पासून दूर राहण्याच्या आवश्यकतेवर त्यानी भर दिला आहे" [७]. शेतकऱ्याचे वर्तन सदाचारी व निरामय नसेल तर त्यांच्या स्थितीत सुधारणा होणे शक्य नाही असाही विचार त्यांनी मांडला.

म. फुले यांनी आपल्या आयुष्यभर उपेक्षीत लोकांना उपदेश केला. शेतकऱ्यांसाठी अहोरात्र लढा दिला. शेतकऱ्याच्या मुर्खपणावर व्यंगात्मक भाष्य केले, त्यांचा धिक्कार केला. जो कोणी एकापेक्षा जास्त स्त्रीयाशी विवाह करतो त्यांच्या विषयी ते म्हणतात - "तरीही ते एकापाठोपाठ एक, दोन, चार स्त्रियासोबत विवाह करतात या अत्याचारी न्यायाला काय म्हणावे ? माझ्या मते त्यांनी आणखी एका पाचव्या स्त्री सोबतही विवाह करायला पाहिजे म्हणजे त्याचा मृत्यु झाल्यावर चार स्त्रीया त्याची तिरडी उचलतील आणि पाचवी टिटवी उचलून त्याला मुलाच्या चिंतेतून मुक्त करेल. " [८] यावरुन म. फुले चे सूक्ष्मनिरिक्षण, बुध्दिवादी दृष्टीकोन, विचाराची प्रखरता ही फुल्यांच्या व्यक्तिमत्वाची ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात.

वरील संपूर्ण विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, महात्मा फुलेचे कृषीविषयक विचार राष्ट्र उद्धाराचे आहेत, राष्ट्राच्या समाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकासाचे विचार आहेत. "भारताच्या लोकशाहीमध्ये शेतकरी व मजुरांची जशी प्रगती होईल तसतसे इतिहासामध्ये महात्मा फुलेचे व्यक्तिमत्व अधिक अधिक प्रकाशमान होईल" [९] असे पं. नेहरु म्हणतात.

## संदर्भ ग्रंथ


१. साळुंखे डॉ. आ.ह. -प्रस्तावना,'म.ज्योतीबा फुले साहित्य आणि साहित्यमूल्ये,' प्रतिमा प्रकाशन ,पुणे प्र.आ. २००३, पृ. १८
२. जोशी लक्ष्मणशास्त्री तर्क तिर्थ, १९९२ जोतीचरीत्र, नवी दिल्ली, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, पृ. ४४
३. सरदार ग.बा. 'म.फुले व्यक्तिमत्व आणि विचार' ग्रंथाली प्रकाशन, पुणे, व्दि.आ. २००५, पृ.१
४. महात्मा फुले : समग्र वाङ्मय - म.रा. साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई , पाचवी आवृत्ती , षृ. २७८
५. भोळे भा.ल., 'महात्मा जोतीराव फुले वारसा आणि वसा' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००९,पृ. १८
६. नरके हरी (संपा), १९९३, 'महात्मा फुले साहित्य और विचार', मुंबई, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाश समिती, पृ. ३४
७. तत्रैव, पृ. ३५
८. महात्मा फुले गौरव ग्रंथ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले, राजर्षी शाहु, चरित्र साधने प्रकशन समिती, मुंबई.
९. नरके हरी (संपा), १९९३, 'महात्मा फुले साहित्य और विचार', मुंबई, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाश समिती, पृ. २